आपल्या सर्वांना हे समजलेच पाहिजे....!

National Leprosy Eradication Programme
Maharashtra

1

कुष्ठरोग अनुवंशिक नाही.

सुक्ष्मदर्शक यंत्राखाली कुष्ठजंतू लाल काड्यांसारखे दिसतात.

कुष्ठरोग हा कुष्ठजंतूंमुळे होणारा एक सर्वसामान्य रोग आहे.

2

कुष्ठरोगाचे जंतू हवेमार्फत बहुविध औषधोपचार (एमडीटी) न झालेल्या सांसर्गिक कुष्ठरोग्याच्या शिंकण्यातून, खोकल्यातून व श्वसनातून आपल्यापर्यंत पोहचतात.

कुष्ठरोगाविरुद्धच्या उत्तम रोगप्रतिकार शक्तीमुळे ९८% लोकांना कुष्ठरोग होत नाही.

3

तपासून घ्या... त्वचेच्या पोतातील (रंग-रुपातील) बदल. तेलकट, लालसर व जाडसर त्वचा.

वेळीच उपचार न झाल्यास पुढे जावून कानाच्या पाळी जाड होतात, भुवयांचे केस झडतात, अंगावर गाठी येतात, हाता-पायांत सुन्नपणा / बधिरता येते.

4

तपासून घ्या... अंगावरील कुठलाही त्वचेच्या रंगापेक्षा फिक्कट / हलक्या किंवा लाल रंगाचा डाग किंवा चट्टे.

कुष्ठरोगाची सुरूवात एक किंवा अनेक डागांपासून होऊ शकते.

5

तपासून घ्या... हातापायातील सुन्नपणा, शारीरिक विकृती. वारंवार होणाऱ्या व बऱ्याच दिवसांपासूनच्या जखमा.



एकूण कुष्ठबाधितांमध्ये चेतातंतू बाधित झाल्याने शारीरिक विकृतीचे प्रमाण केवळ ३ ते ५ टक्केच असते.

6

सर्वच डाग कुष्ठरोगाचे नसतात.....!

जन्मखूण

दूधासारखा पांढरा डाग / चट्टा

गजकर्ण, इसब / नायट्याचे डाग

जन्मापासूनचा डाग, पांढऱ्या रंगाचा डाग, कमी कालावधीचे व ऋतुमानानुसार जावून येणारे **डाग कुष्ठरोगाचे नसतात.**

7

कुठल्याही अवस्थेतील कुष्ठरोग बहुविध औषधोपचाराने (एमडीटी) पूर्णपणे बरा होतो.

पी.बी. रुग्ण
६ महीने उपचार

औषधोपचारापूर्वी

औषधोपचारानंतर

एम.बी. रुग्ण
१२ महीने उपचार

एम.डी.टी. (मल्टी ड्रग थेरपी) औषधोपचार सर्व सरकारी व नगरपालिकांच्या दवाखान्यांत मोफत मिळतो.

8

कुष्ठबाधिताच्या विकृती व जखमांमुळे कुष्ठरोग पसरत नाही. स्वयंदेखभालीने विकृती सुधारता येतात.

एम.डी.टी. उपचार घेतलेला कुठलाच कुष्ठबाधित रोगप्रसार करत नाही. कुटुंबात व समाजात त्याला सर्वसाधारण जीवन जगण्याचा पूर्ण हक्क आहे.

Developed by
ALERT-INDIA Technical Resource & Training Unit (TRTU)
Tel.: 2403 3081 / 82, 2407 2558 Fax : 2401 7652
E-mail : info@alertindia.org Visit us at: www.alertindia.org

समाजातील प्रत्येक व्यक्तीला कुष्ठरोगाची अद्ययावत् माहिती द्या.